● रविवार, दि. २० ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ८८ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

नेत्रसहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# राजेंद्र शिंगणेंची घरवापसी!

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश



मुंबई - विधानसभा निवडणुकांचा तारखा जाहीर झाल्यानंतर राज्यात राजकीय घडामोडींने वेग धरला आहे. महायुती तसेच महाविकास आघाडीतील नेत्यांच्या वरिष्ठ पातळीवर बैठकांचे सत्र सुरू झालेले आहे. कोणत्याही क्षणी जागावाटप होऊ शकते. अशावेळी अनेक नेते या पक्षातून त्या पक्षात प्रवेश करीत आहेत. अजित पवार गटातील विद्यमान आमदार राजेंद्र शिंगणे यांनी नुकतीच अजित पवारांची साथ सोडून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. ऐन निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादीला हा मोठा धक्का मानला जात आहे. राजेंद्र शिंगणे यांनी मुंबईत शनिवार (दि १९) रोजी झालेल्या एका कार्यक्रमात हा प्रवेश केला आहे. यावेळी शरद पवार व जयंत पाटील यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

गेल्या काही दिवसांपासून डॉ. राजेंद्र शिंगणे हे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात नाराज असल्याने ते राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश करणार असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा होती. त्या अनुषंगाने डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी काही दिवसांपूर्वी शरद पवार यांची भेट घेतली होती. त्यानंतर त्यांनी प्रतिक्रिया देत मतदारसंघातील नागरिकांच्या आणि कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेत आपण पुढचा निर्णय घेणार असल्याचं सूचक विधान केले होते. त्यानंतर आज शनिवार (दि १९) रोजी अखेर डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला.

डॉ.राजेंद्र शिंगणे हे सिंदखेडराजा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत. राजेंद्र शिंगणे यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्यानंतर आता त्यांना पुन्हा एकदा सिंदखेडराजा मतदारसंघामधून उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, राजेंद्र शिंगणे यांच्या विरोधात त्यांची पुतणी गायत्री शिंगणे बंडाच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. माजी मंत्री आणि आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांचा शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश हा अजित पवारांच्या राष्ट्रवादीसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

काही दिवसांपूर्वी आमदार रामराजे नाईक निंबाळकर यांचे बंधू आणि सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी १४ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची साथ सोडत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला. तसेच फलटणचे आमदार दीपक चव्हाण यांनी देखील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला होता.

# भेल व्यवसायिकाची मोती तलावात उडी घेऊन आत्महत्त्या

### तीन तासांच्या शोध कार्यानंतर मिळाले तरुणाचे शव

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील मोती तलावात शहरातली एका भेळ विक्रिचा व्यवसाय करणारे बालाजी शेषराव मैंद या ४० वर्षीय व्यावसायिकाने शुक्रवार (दि १८) रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास तलावाच्या पाण्यात उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे, यावेळी त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या नागरिकांनी आरडा ओरडा केली असता त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र वाचवू शकले नाही. याची माहिती तात्काळ चंदंनझिरा पोलिसांना दिली मिळालेल्या माहितीवरून चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सम्राट सिंग राजपूत यांनी आपल्या फौज फाट्यासह घटनास्थळी धाव घेतली. यावेळी त्यांनी सुद्धा याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला मात्र तरुण आढळून आला नाही. प्रसंगी घटनास्थळी अग्निशामक दल दाखल झाले व त्यांनी सुद्धा सुमारे तीन तास बालजी मैंद याचा तलाव परीसरात शोध घेतला मात्र ते आढळून आली नाही यावेळी पोलीस प्रशासन व अग्निशामक विभाग व स्थानिक नागरिकांच्या मदतीने अथांग प्रयत्न केल्यानंतर तीन ते सव्वा तीन तासानंतर बालाजी यांचा मृतदेह आढळून आला नाही रात्री नऊ वाजेच्या सुमारास शेख चांद पाशा याला तलावत शोधण्यासाठी पाठवण्यात आले अर्धा तासानंतर बालाजी यांचा मृतदेह आढळून आला आहे, यावेळी त्यांना तात्काळ जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता त्यांना त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले आहे ,याप्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यामध्ये आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहे, मात्र या व्यवसायिकाचा मृत्यूने संपूर्ण जालना शहरासह परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे, कारण हा व्यक्ती आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करण्यासाठी भेळचे स्टॉल लावून आपला परिवाराचा गाडा हाकलत होता आणि त्याच्यावर ही वेळ का आली. याचीच परिसरात व शहरात चर्चा होत होती.

# मतदान जनजागृती



**परतूर । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पद्माकर गायकवाड, व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, डॉ.प्रतिभा गोरे , यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताह साजरा होत आहे.मतदान जनजागृती अभियान प्रत्येक गावागावात जाऊन जनतेला मतदानाचे हक्क समजावून सांगणे मतदान किती तारखेला आहे. हे सर्व जनतेला माहित होण्यासाठी.९९ परतुर विधानसभा मतदारसंघात शंभर टक्के मतदान होण्यासाठी व लोकांमध्ये मतदानाचे महत्त्व समजण्यासाठी मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी हे अभियान होण्यात येत पान २ वर

# सायबर भामट्यांपासून सावध रहा

## सायबर शाखाचे प्रभारी पोनि गुणाजी शिंदे यांचे आवाहन



**जालना । प्रतिनिधी -** दीपावली सणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सायबर भामट्यांपासून सावध राहावं असं आवाहन जालना सायबर पोलिसांनी केलंय. ऑनलाईन प्रणालीच्या माध्यमातून सायबर भामटे नगरिकांना खरेदीच्या आकर्षक जाहिराती दाखवून त्यांना भुरळ पाडून त्यांची फसवणूक करू शकतात.

सायबर शाखेचे प्रभारी पोलीस निरिक्षक गुणाजी शिंदे यांनी आज दि.१९ शानिवार रोजी दुपारी साडेबारा वा. दम्यान सायबर गुन्हेगारी विषयी जिल्ह्याभरातील नागरीकांना अवाहन केले.

सध्या सणावाराचे दिवस असून आगामी काही दिवसात दिवाळी हा महत्त्वाचा सण येत आहे. त्या अनुषंगाने वेगवेगळ्या कंपन्यांमार्फत आकर्षक आफर च्या माध्यमातून जाहिरातीं दिल्या जातात त्यातच काही सायबर गुन्हेगारांच्या वतीने फसवणुकीचे प्रकार घडत असतात त्यामुळे अनोळखी किंवा फसवणूक करणाऱ्या कोणत्याही ऑनलाईन लिंक वर ग्राहकांनी संपर्क साधू नये तसेच फसवणूक करणाऱ्या लिंक शेअर करू नये,आपले बँक अकांऊटच्या डिटेल अशा लिंक वर टाकू नये असे अवाहन सायबर चे प्रभारी पो.निरि. गुणाजी शिंदे यांनी केले आहे.

युवा आदर्श

### दंगल ...

जागा वाटप चर्चेत
रंगली कुस्ती दंगल
सर्व प्रकारचे प्राणी
नेत्याचे भरले जंगल
आवड निवड चाले
कुणाचे शुभ मंगल
पक्ष श्रेष्ठीच्या हाती
कसे जमावे युगल
पक्षनिष्ठा रक्षकांची
होते टवाळी टिंगल
इच्छेवर फिरे पाणी
काहीही निघे हेंगल
ऐनवेळी मारा टांग
दिली जाणार बगल
कोण पडेल आडवा
कळणार ना भगल
कधी नाक दाबायचे
बरोबर कळे चुंगल
तिकीट देणारं बोले
कधीही स्वप्न भंगल
सत्तेचे सगळे भुकेले
एक से एक पागल
दिल्ली तख्ता करता
आसुसले ते मोगल

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# नाष्ट्यात अळ्या!

## संत रामदास वसतीगृहातील प्रकार; कारवाईची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** येथील संत रामदास या शासकीय वसतीगृहातील नाष्ट्यात अळ्या निघाल्याचा धक्कादायक प्रकार शनिवार (दि.१९) दुपारी समोर आला आहे. या वसतीगृहात जिल्ह्यातील अनेक मुलं शिक्षणासाठी राहतात. या मुलांना सकाळी नाष्टा आणि दोन वेळा जेवन दिले जाते. ते अतिशय निकृष्ट दर्जाचे असून भेसळयुक्त असल्याचे येथील विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. शनिवार रोजी सकाळी नाष्ट्यातील पोह्यात अळ्या निघाल्याचा प्रकार घडल्यामुळे विद्यार्थी संतप्त झाले असून दोषींवर कारवाई करण्याची मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्यावतीने करण्यात आली आहे. या संबंधित अभाविपने समाज कल्याण सहाय्यक पान २ वर

# आरोग्य सुविधेच्या दृष्टिकोनातून मतदारसंघाला परिपूर्ण बनवण्याचा प्रयत्न - लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** गेली अनेक वर्षांपासून परतूर व परिसरात आरोग्या बाबतच्या सुविधेंचा अभाव होता. मतदारसंघातील नागरिकांना आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात जनसामान्यांचे आरोग्य चांगले रहावे, याकरीता राज्य व केंद्र सरकारकडे सातत्याने प्रयत्न करून परतुर तालुकासाठी ६० कोटी रुपयांचे उपजिल्हा रुग्णालय तर मंठा तालुक्यासाठी स्वतंत्र ६० कोटी रुपयांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करून आणले असून लवकरच या उपजिल्हा रुग्णालयात जिल्हा पातळीवरच्या सर्व आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे व परतुर विधानसभा मतदारसंघाला आरोग्य सुविधेच्या माध्यमातून परिपूर्ण बनवण्यासाठी आपला मानस असल्याचे माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले आहे.



मंठा व परतुर या दोन उपजिल्हा रुग्णालयासाठी प्रत्येकी ६० कोटी रुपये प्रमाणे १२० कोटी रुपये वाटूर आष्टी दहिफळ खंदारे ढोकसाळ श्रीष्टी व सातोना या सहा प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्रत्येकी ६ कोटी २२ लाख रुपये प्रमाणे ३७ कोटी ३२ लाख रुपये तर खोराड सावंगी व उस्वद येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी प्रत्येकी ५५ लाख रुपये याप्रमाणे १ कोटी १० लाख रुपये निधी केंद्र सरकारच्या वतीने मंजूर करण्यात आला आहे त्यासाठी माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाकडे मोठा पाठपुरावा केला होता अशी माहिती देखील माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या वतीने देण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकात दिली आहे

परतूर विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या हक्काचे घर मिळावे यासाठी आमदार लोणीकर यांच्या माध्यमातून विशेष प्रयत्न करण्यात आले असून मतदारसंघात परतून मंठा व पान २ वर

# वंजारी समाज भवनासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही-अर्जुनराव खोतकर



**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना हा पक्ष नेहमीच वंजारी समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला असून भविष्यातही राहील, यात कोणतीही शंका नाही. त्यामुळेच आपण देखील वंजारी समाज भवनासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही शिवसेनेचे नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी येथे बोलतांना दिली.

जुना जालना भागातील भगवान सेवा मंडळाच्या कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात श्री. खोतकर बोलत होते. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, मेघराज चौधरी यांची विशेष उपस्थित होती. तर या कार्यक्रमासाठी अशोकराव आघाव, गतत घुगे, मुरलीधर काकड, राजेंद्र राख, डॉ. चौरे, भगवान सेवा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. श्रीमंतराव मिसाळ, गजानन गिते, विजयकुमार वाघ, मधुराज डोईफोडे, महादेव आघाव, के. पी. विघ्ने, विलास जायभाये, बंडु इघारे, उध्दवराव जायभाये, बाबासाहेब गिते, शेषराव वाघ, ओमप्रभू नागरे, दिपक दराडे, भगवानराव गिते, संदीप घुले, ब्रम्हा वाघ, काळुसे सर, सुखदेव नागरे, ॲड. मधुकरराव सोनुने, इंजि. हुसे, कैलास हजारे, गणेश घुगे, ॲड. राजेश वाघ, पालवे, प्रकाश जायभाये, योगेश घुगे, वाघ, मयुर भताने, शिवाजी वाघ आदींची उपस्थिती होती.

वंजारी समाज भवनासाठी जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी पाठपुरावा केला होता. त्याअनुषंगाने बोलतांना श्री. खोतकर पुढे म्हणाले की, वंजारी समाजासाठी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या नावाने आर्थिक विकास महामंडळ व्हावे, अशी मागणी नुकतीच जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी माझ्याकडे केली होती. याची पान २ वर

## संपादकीय

# घटना बदलामुळे झाले शत्रू

जगात अनेक विक्षिप्त हुकुमशहा होऊन गेले आहेत. या विक्षिप्त हुकुमशहांमुळे अनेकदा जग अडचणीत आले आहे. या विक्षिप्त हुकुमशहांमुळे अनेक युद्ध झाली आहेत. उत्तर कोरियाचा हुकुमशहा किम जोंग उन हा ही असाच एक विक्षिप्त हुकुमशहा आहे. तो कधी काय निर्णय घेईल याचा नेम नाही. आताही या विक्षप्त हुकुमशहाने असाच एक निर्णय घेऊन संपूर्ण जगाची डोकेदुखी वाढवली आहे. किम जोंग उन याने आता उत्तर कोरियाच्या घटनेतच बदल केला आहे. किम जोंग उन याने आपल्या घटनेत बदल करताना दक्षिण कोरियाला आपला नंबर एकचा शत्रू म्हणून घोषित केले आहे. त्याने तसे आपल्या घटनेतच तसे नमूद केले आहे. शत्रूचा उल्लेख असणारी एकमेव घटना अशी आता उत्तर कोरियाची ओळख बनली आहे. किम जोंग उन याने जानेवारी महिन्यातच दक्षिण कोरियाला आपला नंबर एक चा शत्रू घोषित केले होते. इतकेच नाही तर उत्तर कोरियातून दक्षिण कोरियाकडे जाणारे रस्ते आणि रेल्वेचे दुवे ही तोडून टाकले आहेत. त्याने घटनेतच बदल करून दक्षिण कोरियाला आपला शत्रू म्हणून घोषित करून घटनेत असेही नमूद केले आहे की जर दक्षिण कोरियाने आमच्या जमीन, हवा, पाण्याच्या 0.00१ मिमी क्षेत्रावरही अतिक्रमण केले तर आम्ही दक्षिण कोरियाशी युद्ध पुकारु. प्रसंगी युद्धात अण्वस्त्रांचाही वापर करू. किम जोंग उन ने घटनेत बदल करून दक्षिण कोरियाला शत्रू नंबर १ घोषित तर केलेच आहे त्यासोबतच आपल्या सैन्यात नवीन १४ लाख सैनिकांची भरती करण्याचे आदेशही दिले आहेत. उत्तर कोरियाकडे आता १२ लाख सैनिक असून सहा लाख सैनिक राखीव आहेत त्यात या चौदा लाख सैनिकांची भर पडणार आहे. उत्तर कोरिया आज अण्वस्त्र संपन्न राष्ट्र आहे. या देशाकडे अनेक अण्वस्त्रे आहेत. तसेच तो सातत्याने क्षेपणास्त्रांची चाचणी घेत असतो. क्षेपणास्त्रांची चाचणी घेऊन तो अमेरिकेलाही इशारा देत असतो. अर्थात त्याला रशिया आणि चीनचा पूर्ण पाठींबा आहे त्याच जोरावर तो हे सर्व करत आहे पण हे करताना तो जगाला ही विनाशाच्या खाईत नेत आहेत. किम जोंग उन ने अशा प्रकारे घटनेत बदल करून दक्षिण कोरियाला नंबर १ चा शत्रू घोषित केल्याने दक्षिण कोरियाच्या अडचणी वाढल्या असून दक्षिण कोरिया ही किम जोंग उन ला जशास तसे उत्तर द्यायला तयार आहे. किम जोंग उन च्या या उदव्यापामुळे कोरियन द्वीपकल्पात कमालीचा तणाव वाढला आहे. उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया यांच्यातील वैर जगाला नवे नाही. या दोन देशात गेली अनेक दशकांपासून वैर आहे. हे वैर थांबायचे नाव घेत नाही उलट वाढतच चालले आहे. आता किम जोंग उन ने घटनेत केलेल्या या बदलामुळे या दोन देशातील वैर आणखी वाढणार आहे. कदाचित ते युद्धापर्यंत ही पोहचू शकते. आधीच रशिया - युक्रेन आणि इस्राईल - पॅलेस्टाईन युद्धाने जग ग्रासले आहे त्यात आता या नव्या युद्धाची भर पडली तर जगाची चिंता आणखी वाढेल.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# नळदुर्ग हा महाराष्ट्रातील सगळ्यांत मोठा मिश्रदुर्ग

मराठवाडा म्हटलं की कमी पाऊस, शेतकरी आत्महत्या, योजनांचा आणि निधीचा अनुशेष असं साधारण चित्र अनेकांच्या डोळ्यासमोर येतं पण तुम्हाला माहितीय का की प्राचीन काळी युरोपसोबत होणाऱ्या व्यापाराचं मराठवाडा हे एक महत्त्वाचं केंद्र होतं.

मराठवाड्यातल्या तेर, पैठण, भोकरदन अशा छोट्या छोट्या शहरांमधला माल सह्याद्रीच्या नाणेघाटातून नालासोपारा बंदरात जाई आणि तिथून जहाजाद्वारे तो माल युरोपात पोहोचवला जात असे.

दक्षिण भारत ते युरोप व्हाया मराठवाडा अशा या प्राचीन काळातील व्यापारी मार्गाला संरक्षित करण्यासाठी या रस्त्यावर अनेक महत्त्वाचे किल्ले बांधले गेले.

सुमारे दोन हजार वर्षांपासून विविध राजवंशांनी मराठवाड्याच्या या भूमीवर राज्य केलं आणि त्यामुळेच मराठवाड्यातल्या उस्मानाबाद जिल्ह्यात अनेक महत्त्वपूर्ण किल्ले बांधले गेले.

मराठवाड्याच्या रणरणत्या उन्हात कधी साम्राज्याचं रक्षण करण्यासाठी तर कधी रयतेला रसदेची वानवा जाणवू नये म्हणून नळदुर्ग, परंडा, औसा, उदगीर, रामदुर्ग हे किल्ले कणखरपणे उभे होते.

नळदुर्ग हा महाराष्ट्रातील सगळ्यांत मोठा मिश्रदुर्ग आहे.

नळदुर्ग आणि रणमंडळ अशा दोन किल्ल्यांना जोडून बनवण्यात आलेला हा किल्ला अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण या किल्ल्यात केलेलं पाण्याचं व्यवस्थापन आणि त्यातून किल्ल्याच्या शासकांनी आजूबाजूच्या प्रदेशावर मिळवलेलं नियंत्रण हा खरोखर अभ्यास करण्याजोगा विषय आहे.

नळदुर्ग हा तिन्ही बाजुंनी पाण्याने वेढलेला असून या किल्ल्याच्या चौथ्या बाजूला खोल दरी आहे.

नळदुर्ग ज्या डोंगरावर बांधला गेलाय त्या डोंगराला चारही बाजूंनी इतर डोंगरांचं संरक्षण आहे आणि म्हणूनच नळदुर्गच्या अतिशय जवळ गेल्याशिवाय हा किल्ला दिसतच नाही.

सुमारे तीन किलोमीटरवर पसरलेल्या या विस्तीर्ण किल्ल्यात असलेला पाणीमहाल अत्यंत प्रेक्षणीय आहे.

किल्ल्याजवळून वाहणाऱ्या बोरी नदीचं संपूर्ण पात्र वळवून त्याचा उपयोग किल्ल्याच्या रक्षणासाठी केला गेलाय. पावसाळ्यात पाऊस झाला की या किल्ल्यातले वेगवेगळ्या रंगांचे नर-मादी धबधबे पाहायला पर्यटकांची प्रचंड गर्दी होते.

नळदुर्ग आणि रणमंडळ या दोन किल्ल्यांना जोडून हा किल्ला बनवला असल्यामुळे अनेकजण याला जोडकिल्ला असंही म्हणतात.

किल्ल्याच्या सुरक्षिततेसाठी तटबंदी उभारली असून या किल्ल्यात एकूण ११४ बुरुजही आहेत.

परांडा, उपळी, संग्राम आणि नवबुरुज ही नळदुर्गच्या काही मुख्य बुरुजांची नावं. यापैकी उपळी बुरुजावर तीन तोफा ठेवण्याची प्रशस्त जागा असून किल्ल्यातलं हे सगळ्यांत उंच ठिकाण आहे.

किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी हुलमुख दरवाजा हा मुख्य दरवाजा आहे. नळदुर्गच्या किल्ल्याची रचनाच शत्रूला चकवा देण्यासाठी केली गेलीय हे या गडाच्या दरवाजावरूनच कळतं.

तुम्ही सुरुवातीला एका दरवाज्यासारख्या दिसणाऱ्या प्रवेशद्वारात जाता तेंव्हा तुम्हाला कळतं की हा गडाचा मुख्य दरवाजा नसून हा केवळ एक चकवा आहे.

काही वळणं घेतल्यानंतर किल्ल्याचं मुख्य प्रवेशद्वार नजरेस पडतं आणि मग सुरु होतो रहस्यमयी नळदुर्गची एकेक गुपितं उलगडण्याचा अतिशय रंजक प्रवास.

पौराणिक काळातील नळ आणि दमयंती यांच्याशी या किल्ल्याचा संबंध जोडला जातो. 'तारीख ए फरिश्ता' या ग्रंथामध्ये हा किल्ला राज 'नळ' याने बांधला असा उल्लेख करण्यात आलेला आहे. यावरूनच या किल्ल्याला नळदुर्ग असं नाव मिळालं.

इतिहासकार आणि अभ्यासक जयराज खोचरे असं सांगतात की नळदुर्ग या शहराचं जुनं नाव मैलारपूर असं आहे.

मैलार म्हणजे खंडोबा. तेलुगू भाषेत 'नल्ला' म्हणजे काळा आणि 'दुर्ग' म्हणजे किल्ला. याचनुसार काळ्या कातळापासून बनलेल्या या किल्ल्याला 'नळदुर्ग' असं नाव पडलं असल्याचीही दाट शक्यता आहे.

आदिलशाहीमध्ये या किल्ल्याला शाहदुर्ग असं नाव ठेवलं गेलं असलं तरी हे नाव काही प्रचलित होऊ शकलं नाही.

चालुक्य, बहामनी, निजाम शाही, आदिलशाही, मोगल, मराठे आणि इंग्रजांची सत्ता पाहिलेला हा नळदुर्ग स्वतंत्र भारतातही अत्यंत कणखरपणे उभा आहे.

'दुर्ग नळदुर्ग' या पुस्तकात नळदुर्ग किल्ल्याच्या इतिहासाबाबत जयराज खोचरे असं लिहितात की, बहामनी काळात इसवीसन १३५१ ते १४८० या काळात मातीच्या किल्ल्याची पुनर्बांधणी करण्यात आली.

मातीची जागा दगडाने घेतली आणि नळदुर्गचा हा किल्ला भरभक्कम बनला. याच किल्ल्याला लागून एक जुना रणमंडळ नावाचा एक किल्लाही आहे.

इसवीसन १४८१ मध्ये विजापूरच्या आदिलशहाने नळदुर्ग किल्ला जिंकला.

पुढे १५५८ मध्ये आदिलशहाने या किल्ल्याला दगडी चिऱ्यांची मजबूत तटबंदी बांधली आणि दुसऱ्या इब्राहिम आदिलशहाने इसवीसन १६१३ मध्ये बोरी नदीवर बंधारा बांधून पाणीमहालाचे काम हाती घेतले. यामुळेच नळदुर्ग आणि रणमंडळ हे किल्ले एकमेकांशी जोडले गेले.

इसवीसन १६७६ मध्ये औरंगजेबाने हा किल्ला जिंकून घेतला आणि मुघलांनी या किल्ल्यावर ताबा मिळवला.

पुढे १७२४ मध्ये मीर कमरुद्दीन उर्फ निजाम-उल-मुल्क आसफजाह' याने मोगलांशी फारकत घेऊन स्वतंत्र सत्ता स्थापन केली आणि नळदुर्ग निजामांच्या ताब्यात आला.

१७५८ मध्ये पेशव्यांनी शिंदखेडच्या तहात हा किल्ला जिंकला होता आणि म्हणून नळदुर्गवर काहीकाळ मराठ्यांची सत्ताही होती. पण पुन्हा एकदा निजामाने हा किल्ला स्वतःच्या ताब्यात घेतला.

ईस्ट इंडिया कंपनीच्या कर्जापोटी पुढे १८५३ मध्ये निजामाने वऱ्हाड, नळदुर्ग आणि रायचूर हे जिल्हे इंग्रजांना आंदण दिले.

१८५७ मध्ये उठाव झाला आणि तो उठाव मोडीत काढण्यासाठी निजामाने सहकार्य केलं म्हणून इंग्रजांनी नळदुर्ग आणि रायचूर हे दोन किल्ले निजामाला बक्षीस म्हणून दिले.

पुढे १९४८ मध्ये भारत सरकारने पोलीस ॲक्शन करून हा किल्ला आणि संपूर्ण मराठवाडा निजामाच्या ताब्यातून सोडवला आणि हा भूभाग स्वतंत्र भारतात सामील झाला.

इब्राहिम आदिलशाह दुसरा याच्या काळात मीर इमादिन या वास्तुशास्त्रज्ञाने हा पाणी महल आणि हे धरण बोरी नदीवर उभं केलंय.

याच पाणीमहलात हिजरी १०२२ (इसवीसन १६१३) मध्ये पर्शियन भाषेत लिहिलेल्या एका लेखावरून या धरणाची विस्तृत माहिती मिळते.

पहिल्या अली आदिलशाहने (इसवीसन १५५८ ते ७९) या धरणाचं बांधकाम सुरु केल्याची माहिती पाणीमहलात असणाऱ्या उल्लेखावरून कळतं. त्यानंतर सुमारे चाळीस वर्षांनी दुसऱ्या इब्राहिम आदिलशाहच्या काळात या धरणाचं बांधकाम पूर्ण झालं.

हे धरण केवळ सामरिकदृष्ट्याच महत्त्वाचं नव्हतं तर आदिलशाहीच्या सुलतान आणि इतर मनसबदारांसाठी ही एक आरामाची जागाही होती.

धरणाच्या भिंतीत असणाऱ्या पाणीमहलात असणारी कारंजी, पाणी महालाच्या खिडक्यांमधून दोन्ही बाजूंनी दिसणारी जलप्रपाताची मनोहर दृश्य हे सिद्ध करतात.

इसवीसन १५२० मध्ये विजयनगर साम्राज्याने आदिलशाहीचा पराभव केल्यानंतर दोन किल्ल्यांना जोडण्यासाठी बांधण्यात आलेलं हे धरण आदिलशाहच्या बचावाच्या योजनेचा एक भाग होता हे सिद्ध होतं. हे धरण डोळ्यांना जेवढं सुंदर दिसतं तेवढंच मेंदूलाही कामाला लावण्याची ताकद त्यात आहे.

मराठवाड्यात होणारा कमी पाऊस पाहता किल्ल्यात राहणाऱ्या सैन्याला आणि रयतेला दुष्काळात पाणी कमी पडू नये यासाठीसुद्धा हे धरण बांधलं होतं.

या धरणाचं एकूण क्षेत्रफळ ८२,५६९ स्क्वेअर किलोमीटर आहे आणि विशेष बाब म्हणजे या पठारावर असणाऱ्या शेतीची समुद्रसपाटीपासूनची उंची आणि धरणाची उंची एकच असल्यामुळे शेतीला पाणी पुरवणं देखील अत्यंत सोपं आहे.

पाणी अडवण्यासाठी उभारण्यात आलेल्या या धरणाच्या भिंतीत एक अत्यंत हवेशीर पाणी महल बांधलेला आहे.

नदीचं पाणी इथे साठलं की याच महालावरून नर व मादी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सांडव्यातून हे पाणी वाहू लागतं, हे पाणी वाहत असताना या महालाच्या कोणत्याही भागाला पाण्याचा स्पर्शही होत नाही.

पाणी महालापर्यंत जाण्यासाठी पायऱ्या आहेत. पाणीमहालाच्या एका भिंतीवर फारशी भाषेत लिहिलेला एक शिलालेख आहे.

त्यात लिहिलं आहे -

'आजदीदन इ चष्म मुहिब्बान रोशन मीग दर्द व चष्म दुष्मनान गदर्द कूर' त्याचा मराठी अनुवाद 'या महालास मित्रत्वाच्या दृष्टीने पाहिल्यास डोळे दिपून जातील व शत्रुत्वाच्या दृष्टीने पाहिल्यास डोळ्यापुढे अंधकार येईल' असा होतो.

जलव्यवस्थापनातून राज्यव्यवस्थापन

प्राचीनकाळी उंचच उंच डोंगरांच्या माथ्यावर किल्ले बांधले जात असतं. पण काळानुसार युद्धाच्या पद्धतीत बदल होत गेले, राजांकडे असलेल्या सैन्याची संख्या वाढत गेली आणि दुर्गमाथ्यावर किल्ले बांधण्याच्या योजनेवर अनेकांना पुनर्विचार करावा लागला.

शिखरांच्या माथ्यावर बांधलेल्या किल्ल्यांची रसद बंद केली तर किल्ल्यात असणाऱ्या सैन्याला आणि रयतेला पाण्यासाठी केवळ पावसावर अवलंबून राहावं लागायचं.

या पाण्याला साठवण्यासाठी अनेक किल्ल्यांमध्ये बनवलेले पाण्याचे टाके आपण पहिले असतील पण नळदुर्ग याच बाबतीत थोडासा वेगळा आहे.

पाण्यावर नियंत्रण ठेवून प्रदेशातल्या शेतीवर आणि पर्यायाने अर्थव्यवस्थेवर कसं नियंत्रण ठेवलं जायचं याचा उत्तम नमुना म्हणजे नळदुर्ग किल्ल्यात केलेलं हे जलव्यवस्थापन.

पुरातन काळापासून दख्खनच्या सुलतानांसाठी पवित्र आणि धार्मिक आशय असलेले जलव्यवस्थापन हे एक आवश्यक असे राजकीय साधन होते.

त्याकाळातील धरणं ही केवळ पाणी आणि जमिनीवर राजाचं असणारं नियंत्रण दाखवत नव्हती तर धरणांसारख्या अतिशय तांत्रिक बांधकामामध्ये बांधलेला 'पाणीमहल' हे राजाच्या शक्तीचं एक अनोखं प्रतीक म्हणावं लागेल. दक्खनच्या संस्कृतीवर राज्य केलेल्या साम्राज्यांची ही प्रतीकं आहेत.

नळदुर्ग हा किल्ला केवळ साम्राज्याच्या संरक्षणासाठी सीमेवर बांधण्यात आलेली एक वास्तू नव्हती ते 'पाणी' या त्याकाळच्या महत्त्वपूर्ण चलनावर नियंत्रण ठेवणारी ती एक अजस्त्र वास्तू होती.

आदिलशाहीत हे धरण जरी बांधलं गेलं असलं तरी पुढे निजामशाही आणि नंतर इंग्रजांच्या ताब्यात जाऊनही नळदुर्गच्या धरणाने त्या प्रदेशातील शेतीच्या विकासासाठी किंवा त्या शेतीला जिवंत ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

आताची परिस्थिती

अगदी काही वर्षांपूर्वीपर्यंत नळदुर्ग हा अत्यंत दुर्लक्षित किल्ला होता, पण पुढे एका खाजगी कंपनीने या किल्ल्याचं व्यवस्थापन केल्याने लातूर, उस्मानाबाद, सोलापूर जिल्ह्यातील पर्यटकांसाठी नळदुर्ग हे एक आकर्षणाचं केंद्र बनलं आहे.

आता किल्ल्यात बगीचे विकसित करण्यात आले आहे, कारंजी बनवली गेलीयत, शौचालय, पर्यटकांना फिरण्याची सोय व्हावी म्हणून इलेक्ट्रिक गाडी, धरणाच्या जलाशयात बोटिंग इत्यादी सोयी करण्यात आल्या आहेत.

अजूनही चांगला पाऊस झाला की प्रवाहित होणाऱ्या नर-मादी धबधब्यांना बघण्यासाठी पर्यटकांची गर्दी होते.

नळदुर्गला येणाऱ्या पर्यटकांसाठी या किल्ल्याचं स्थापत्य, इतिहास समजावून सांगणारी पुरेशी यंत्रणा इथे उपलब्ध नाहीयेत.

मुंबई-हैद्राबाद महामार्गावर असूनही तुम्हाला रस्त्याने इथे येताना अनेक खड्ड्यांचा सामना करावा लागतो कारण मागच्या दीड दशकापासून या महामार्गाचं काम अतिशय संथ गतीने सुरु आहे.

पान १ वरुन

## मतदान जनजागृती ...

आहे. या अभियानात जनजागृती प्रमुख, परतूर तालुक्यातील शिंगोणा जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक, राजू सावंत. व शाहीर, हेमंत पहाडे. कृष्णा सोनवणे. कृष्णा पाटोळे. हरिराम मुक्ता पल्ले. मुंजा जाधव. मंदाकिनी बिडवे. रेश्मा नरवडे.रुपेश पहाडे. आदी मंडळींनी नाटकाच्या माध्यमातून आणि गीताच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व पटवून दिले आहे.

## नाष्ट्यात अळ्या ...

आयुक्त आनंद कदम यांना निवेदन दिले आहे. विद्यार्थ्यांच्या जीवाशी प्रशासन खेळत असून विद्यार्थ्यांचे काही बरे वाईट झाल्यास यास पूर्णपणे प्रशासन जवाबदार राहणार असल्याचे सांगत दोन दिवसांता कंत्राटी मेस वाल्यांना निलंबित करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली असून अन्यथा विद्यार्थ्यांच्या आक्रोशास सामोरे जावे लागणार असल्याचा ईशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

यावेळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद जालना जिल्हा सहसंयोजक प्रतिक कुलकर्णी, शहर मंत्री गणेश बोंडे, शहर सहमंत्री शुभम खराबे व सौरभ गोफणे, अजिंक्य चव्हाण, सोहम लांडगे, सचिन उगले, अजय डोंगरे, बाबासाहेब आंबेडकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## आरोग्य सुविधेच्या...

जालना या तीन तालुक्या त १४७८४ घरकुलांना मंजुरी देण्यात आले आहे यामध्ये प्रधानमंत्री आवास मोदी आवास यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना रमाई आवास योजना शबरी आवास योजना या घरकुलांच्या संबंधित योजनांचा समावेश आहे त्यामध्ये परतुर तालुक्यात ६३४९ (८० कोटी रुपये), मंठा तालुक्यातील ६९६१ (१०१ कोटी रुपये) व जालना तालुक्यातील १४८४ (१८ कोटी रुपये) अशा एकूण १४७८४ घरकुलासाठी १९९ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असून बहुतांश घरकुलांचा पहिला हप्ता प्राप्त झाला आहे उर्वरित घरकुलांचा १५ हजार रुपयांचा पहिला हप्ता लवकरच प्राप्त होईल असे देखील यावेळी लोणीकरांच्या वतीने प्रसिद्धी पत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या माध्यमातून परतून विधानसभा मतदारसंघातील पहिल्या टप्प्यात ६५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते त्यामध्ये अनेक गावांचा समावेश होऊन शेतकऱ्यांना समृद्ध बनवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात देखील परतून विधानसभा मतदारसंघातील ५१ नवीन गावाची निवड करण्यात आली असून पात्र शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार विहीर शेततळे शेडनेट ट्रॅक्टर शेती अवजारे पेरणी यंत्र मळणी यंत्र रोटावेटर इत्यादी दिले जाणार असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे बबनराव लोणीकर यांनी दिली आहे.

## वंजारी समाज ...

दखल घेऊन आपण समाजाच्या शिष्टमंडळासह मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांची मुंबईत भेट घेऊन महामंडळ स्थापन करावे, अशी मागणी त्यांच्याकडे केली व मुख्यमंत्री महोदयांनी त्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला. यानंतर जालना येथे खा. श्रीकांत शिंदे आले असता भाऊसाहेब घुगे यांच्या विनंतीवरुन वंजारी समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींची बैठक घडवून आणली. समाजाच्या महामंडळासह विविध मागण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. समाज भवनासाठी भाऊसाहेब घुगे यांच्या मागणीनुसार पहिल्यांदा पन्नास लक्ष रुपयांचा आणि नंतर ऐंशी लक्ष रुपयांचा निधी मंजूर केल्याचे सांगून श्री. खोतकर म्हणाले की, वंजारी समाजासाठी सहकार्य करणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

# नका मांडू शिक्षणाच्या नावारवाली प्रेमाचा बाजार?

गावातील शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर आई वडील आपल्या मुला मुलींना उच्च शिक्षणासाठी शहरी भागात पाठवतात.काही विद्यार्थी आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून प्रामाणिकपणे अभ्यास करतात तर काही विद्यार्थी शिक्षणाच्या नावाखाली नुसता प्रेमाचा बाजार मांडतात. होय हे अगदी खरे आहे की, आजकालचे विद्यार्थी प्रेमाने पुरते भारावून गेले आहेत. कॉलेज म्हणजे त्यांना ज्ञानाचे मंदिर वाटत नाही तर प्रेम करण्याचे रमणीय ठिकाण वाटत आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. आई वडील आपल्या पाल्यांना फक्त गावातील शाळेत शिकायला असेपर्यंतच नीट लक्ष देतात आणि विद्यार्थीही गावात शिकायला असेपर्यंतच मायबापाच्या दबावाखाली नीट लक्ष देऊन अभ्यास करतात. एवढेच नाही तर दहावी बोर्ड परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होतात. काही विद्यार्थी बाहेरगावी उच्च शिक्षण शिकायला गेले तरी आपला शैक्षणिक दिनक्रम तुटू देत नाहीत.उलट जोमाने अभ्यास करून आपल्या आई-वडिलांचे व गावकऱ्यांचे स्वप्न साकार करतात. कारण त्यांना आपल्या आई-वडिलांचे व बहिण भावांचे कष्ट दिसत असतात.आई-वडिलांच्या कष्टांचे चीज करणे हेच त्यांचे ध्येय असते.म्हणून ते झपाटल्यागत अभ्यास करून यशोशिखर गाठतात.अशा ज्ञानवंत व गुणवंत विद्यार्थ्यांना मनापासून सलाम करावा वाटतो.पण काही विद्यार्थी दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यावर जेव्हा महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करतात तेव्हा ते आई-वडिलांच्या व गावकऱ्यांच्या बंधनातून मुक्त होतात. कारण शहरी भागात त्यांच्यावर लक्ष ठेवायला आता कोणीच नसते. प्रेमाने झपाटलेले आमचे विद्यार्थी अवांतर वाचन व लेखन करायचे सोडून प्रेमाचे धडे गिरवतात.मायबाप मोठ्या आशेने आपल्या मुला-मुलींना बाहेरगावी कॉलेजला पाठवतात व त्यांना शिक्षणासाठी वेळेवर पैसा पण पाठवतात पण हे विद्यार्थी तो पैसा नको त्या ठिकाणी लावतात.कारण त्यांना कॉलेज म्हणजे प्रेमाचे माहेरघर असल्यासारखे वाटते. कॉलेजला जाणे म्हणजे फक्त प्रेम करणे हेच त्यांना माहीत असते. तिथे गेल्यावर त्यांना एका वेगळ्याच दुनियेत आल्यासारखे वाटते आणि कॉलेज म्हणजे प्रेमाचे धडे देणारी व जीवनात नवचैतन्य पेरणारी जणू शाळाच आहे असे त्यांना वाटते, म्हणून ते कॉलेज जीवनातील प्रेमाचा भरभरून आनंद घेतात. पण त्यांना हे कळत नाही की, आपण जो आनंद घेतो तो क्षणिक आहे आणि क्षणिक सुखासाठी आपण आपले शैक्षणिक जीवन अधोगतीला नेतो आणि जीवनाचे वाटोळे करून घेतो. दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बहुतांश विद्यार्थी हे कॉलेजला गेल्यावर बिघडतात तर काही विद्यार्थी घडतात. हे सत्य नाकारून चालणार नाही. सगळ्यात जास्त प्रेम प्रकरणे हे कॉलेजमध्ये घडतात. अगदी मायबापाच्या दबावाखाली राहून शिकणाऱ्या मुली सुद्धा कॉलेजला गेल्यावर बिघडतात हे विदारक सत्य मी जवळून पाहिले आहे. शिक्षणासाठी आईवडील आपल्या मुलाला वा मुलीला शहरात रूम करून देतात व त्यांना घरच्यांना बोलण्यासाठी व अभ्यासासाठी एक भारी किंमतीचा फोन घेऊन देतात पण आमचे विद्यार्थी त्या फोनचा पण दुरुपयोग करतात व तासनतास फोनवर व्यस्त राहतात. घरच्यांनी शिक्षणासाठी दिलेला पैसा नेट पॅक मारण्यात व कॉफी शॉपला जाण्यात खर्च करतात. दुसरी एक महत्त्वाची बाब म्हणजे काही विद्यार्थी रूमचा वापर शैक्षणिक कामकाजासाठी न करता एकमेकांना भेटण्यासाठी, प्रेमकथा सांगण्यासाठी वा फोनवर तासनतास बोलण्यासाठी रूमचा वापर करतात. खरेतर आईवडिलांनाच कळायला हवे की, आपला मुलगा वा मुलगी आपण पाठवलेल्या पैशाचं नेमकं काय करते? आपण करून दिलेल्या रूमवर नीट अभ्यास करते का? का नुसतं फोनवर बोलते? या सर्व गोष्टींची आपण शहानिशा केली पाहिजे. नाहीतर डोळे झाकून आपण त्यांच्यावर विश्वास ठेवतो व ते मात्र शिक्षणाच्या नावाखाली भलतेच काहीतरी करतात. सांगायचा मुद्दा म्हणजे इथूनच लव्ह मॅरेजचे व पळून जाण्याचे प्रकार घडतात हे आपण सर्वजण उघड्या डोळ्यांनी बघत आहोत. मुलगी कॉलेजला शिकायला ठेवली अन् पळून गेली. मुलगा कॉलेजला गेला अन् तिला घेऊनच गेला अशा आशयाच्या बातम्या रोज वर्तमानपत्रात वाचायला मिळतात.खरेतर विद्यार्थ्यांचा वयात येण्याचा व कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याचा कालावधी एक असतो. म्हणून वयात आल्यावर प्रेम होणे ही जरी नैसर्गिक बाब असली तरी शिक्षणाच्या नावाखाली प्रेमाचा नुसता बाजार नको! कारण नेमक्या याच काळात जर विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य आकार व योग्य दिशा मिळाली तर त्यांच्या जीवनाचे सोने होते आणि हेच विद्यार्थी जर नीट अभ्यास करायचा सोडून प्रेमात आकंठ बुडाले तर त्यांच्या जीवनाचे वाळवंट व्हायला वेळ लागणार नाही एवढे मात्र नक्की.म्हणून जाता जाता तमाम पालकांना एवढेच सांगतो की, आपल्या मुला मुलींना उच्च शिक्षणासाठी शहरी भागात जरुर ठेवा पण तुम्ही देखील त्यांच्या सोबत रहा.आपल्या देखरेखीखाली त्यांना उच्च शिक्षणाचे धडे गिरवू द्या. तुमच्या दबावाखाली ते नीट अभ्यास करतील व अनुचित प्रकार टळतील...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मु.पो.खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# जालना शहरात पावसाचा धुमाकूळ...

# मुसळधार...



( छायाचित्र - किरण खानापुरे )

जालना । प्रतिनिधी - ऐन दिवाळी सणाच्या तोंडावर परतीच्या पावसाचा मुक्काम वाढल्याने राज्यभरात पुन्हा एकदा पावसाने जोर धरला आहे. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडासह अन्य भागातील जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याकडून दोन-तीन दिवसांपुर्वीच वर्तविण्यात आली होती. जालना शहरात शनिवार (दि १९) रोजी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास पावसाने सुरुवात केली जवळपास रात्री साडे दहा वाजेपर्यंत पाऊस सुरुच होता. या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक रस्त्यांवर पावसाचे पाणी साचल्यामुळे रस्त्यांना तळ्याचे स्वरुप आल्याचे दिसून येत होते.

शनिवार (दि १९) सकाळी शहरात ढगाळ हवामान होते. काल म्हणजेच शुक्रवारी देखील रात्रीच्यावेळी हलका पावसाच्या सरी शहरात कोसळल्या होत्या. त्यानंतर शनिवार रोजी दुपारी उकाड्यांने नागरिक त्रस्त होते. अशातच सायंकाळी मुसळधार पावसाला सुरुवात झाली. शहरात असलेल्या अनेक अंडरग्राऊंड कॉम्पलेक्स मध्ये पाणी साचले होते. शहरातील रस्त्यावर पाणी साचल्याने रस्त्यांना तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. रात्री उशिरापर्यंत हा पाऊस सुरुच होता. या पावसामुळे शेतकऱ्यांचे मात्र, मोठे नुकसान होत आहे.

## नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी तेजस सोनाळकर सायकलिंग स्पर्धेमध्ये विभागावर निवड



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** नवभारत कनिष्ठ महाविद्यालय टेंभुर्णी व जे बी के विद्यालय टेंभुर्णी तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील इयत्ता अकरावी विज्ञान चा विद्यार्थी तेजस सोनाळकर यांनी . जिल्हा क्रीडा स्पर्धेमध्ये सायकलिंग मध्ये प्रथम क्रमांक मिळून विभागावर निवड झाली आहे . सदर विद्यार्थ्यास क्रीडा मास्तर राजेश शेवाळे व क्रीडा विभाग प्रमुख कैलास भुतेकर यांनी योग्य मार्गदर्शन केले. त्याचबरोबर उपप्राचार्य दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, त्याचे वर्ग शिक्षक प्राध्यापक सुनील बनसोडे, आदिनी त्याला मार्गदर्शन केले आहे. या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय काबरा, उपाध्यक्ष शेख जमीर, सचिव सत्यनारायण सोनी, कोषाध्यक्ष सुभाष राठी, ज्येष्ठ संचालक रामनारायण काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी अध्यक्ष सुरेश शेठ काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी सचिव प्रेमसुख काबरा, संचालक तथा माझी सचिव प्रल्हाद टेंभुर्णीकर, संचालक राजीव काबरा, संचालक दिपक काबरा, संचालक मधुकरराव निकम, संचालक विश्वनाथराव सांगोळे, संचालक तथा उप प्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर,संचालक प्रदीप मुळे, संचालक प्रदीप काबरा, प्राचार्य नंदकुमार काळे, उप मुख्याध्यापक सोळंके, पर्यवेक्षक धनंजय पुराने,, सखाराम बोरकर,भीवसान ससाने, वासुदेव शिरसागर समाधान कांबळे, प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक अरुण आहेर रामदास भागे,प्रा कैलास जाधव, प्राध्यापक गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, रवींद्र मोरे राजेश शेवाळे, संजय कुलकर्णी,, दिनकर उखार्डे दत्ता उखर्डे कैलास भुतेकर, राजेश शेवाळे, गणेश सावसाक्रेरमेश इंगळे,, आवटी मॅडम पाटील मॅडम भिलावेकर मॅडम जाधव मॅडम शेख मॅडम लंबे मॅडम, राजू डोमळे, नागोराव देशमुख दगडूबा तांबेकर, दीपक देशमुख, सर्व कॉलेज आणि शाळेतील विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## दुभाजकावर दडकून दोन दुचाकीचा अपघात एक जागीच ठार, एक जखमी

**भोकरदन । तडेगाव । प्रतिनिधी -** भोकरदन शहरात दुभाजकावर झालेल्या अपघातात दोन दुचाकींचा समोरासमोर टक्कर झाली, ज्यामुळे एक व्यक्ती जागीच ठार झाली, तर दुसरा गंभीर जखमी झाला. अपघाताच्या स्थळी तातडीने पोलीस आणि वैद्यकीय मदत पाठवण्यात आली. जखमी व्यक्तीला नजीकच्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले ही घटना शुक्रवार रोजी भोकरदन तालुक्यातील जालना रस्त्यावरील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयासमोर झाली मोटारसायकल मागुन येऊन धडकेत एक ठार तर अन्य एक जखमी झाला आहे सोपान राजू गोफने ( वय २२ रा तडेगाव ता भोकरदन) हे मयत झालेल्या युवकाचे नाव असून तर सागर साहेबराव दणके ( वय २० रा तडेगाव ता भोकरदन) हे जखमी झालेल्या युवकाचे नाव आहे हा



अपघात शुक्रवारी (दि . १८ ) सकाळी १० वाजेदरम्यान झाला या अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी भोकरदन येथील शासकीय रुग्णालयात त्याना तात्काळ जखमींना दाखल केले तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून सोपान राजू गोफने ह्यास मृत घोषित करण्यात आले .गंभीर जखमी असलेला सागर दणके ह्यास प्रथम ोपचार देउन त्यास पुढील उपचारांसाठी जालना येथील जिल्हा रुग्णालयात उपचार घेण्यासाठी पाठवण्यात आले अशी माहीती वैद्यकीय अधिकारी डॉ. सहाने यानी दिली. सोपान गाफने याच्या पश्चाताप आई वडील एक भाऊ दोन बहिणी असा परिवार आहेत. गावात हळहळ व्यक्त होत आहेत.

## चंदनझीरा अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी राज्यपालांना निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** चंदनझीरा येथील बालिकेवरील अत्याचार प्रकरणी दि.१८ शुक्रवार रोजी दुपारी एक वा.च्या सुमारास नागरीकांच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मा. राज्यपाल यांना पाठवण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, चंदनझिरा ही वस्ती मागील ४५ वर्षा पासून बसलेली असून या वस्ती मध्ये सर्व जालना एम.आय.डी.सी. मध्ये काम करणारे मोल मजूरी करुन राहाणारे लोक राहातात. एम.आय.डी.सी. असल्यामुळे तेथे पर राज्यातूनही पोट भरण्यासाठी मजूर राहातात. दिनाक १३.१०.२०२४ रोजी रात्री १०.३० वाजेच्या सुमारास चंदनझीरा येथील नऊ वर्षीय चिमुकलीवर १९ वर्षाच्या नराधमाने बलात्कार करुन तिचा जिव घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्या आरोपीला पोलिसानी पकडलेले असून तो आज रोजी पोलिसांच्या ताब्यात आहे. आरोपी हा सवर्ण समाजातील असल्याने त्याला स्थानिक नेते तसेच पोलिस प्रशासनातील काही अधिकारी आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न करत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनाद्वारे मा.राज्यपाल यांच्याकडे पुढील प्रमाणे मागण्या करण्यात आल्या. सदर आरोपीचे दोषारोपपत्र लवकरात लवकर न्यायालयात पाठवण्यात यावे असे निर्देश मा. पोलिस अधिक्षक जालना यांना देण्यात यावेत. सदर आरोपीचे केस ही जलद न्यायालयात चालवून आरोपीस फासीची शिक्षा देण्यात यावी. चंदनझिरा परिसर तसेच इतर ही जालना जिल्हयातील झोपडपट्टी मध्ये चालत असलेले अवैध धंदे तत्काळ बंद करण्यात यावेत. चंदनझिरा परिसर तसेच जालन्यातील इतरही भागातील शाळेच्या समोर दामीनी पथक यांची नियुक्ती करण्यात यावी. अशा मागण्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मा.राज्यपाल यांना पाठवण्यात आले आहे. दिलेल्या निवेदनावर अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अखिल भारतीय ओबीसी एकता परिषद जिल्ह्यातील पाचही विधानसभा लढणार -बाबासाहेब वानखेडे

### जालन्यात बैठक, सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील प्रलंबीत प्रश्न सोडविण्यासाठी अखिल भारतीय ओबीसी एकता परिषद आता विधानसभा निवडणूकीच्या रिंगणात उतरणार आहे. जिल्ह्यातील जालना, परतुर-मंठा, भोकरदन, घनसावंगी मतदार संघात स्वतंत्र उमेदवार उभे करणार आहे. तर बदनापुर- अंबड विधानसभा मतदार संघ राखीव असल्यामुळे येथे राखीव उमेदवाराला पाठींबा देणार आहेत. या निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर उद्या २० ऑक्टोंबर २०२४ रोजी सकाळी १२.३० वाजता नुतनवसाहत अंबड रोड, फ्रेन्डस् कॅपिटल समोर बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस ओबीसी समाजातील सर्व पिवळे झेंडे एकत्र यावे हाच उद्देश आहे. ओबीसी समाजातील महिला व सामाजिक कार्यकर्त्यांनी व ओबीसी , एससी, एसटी, व्हिजीएनटी भटक्या विमुक्त समाजाने बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संस्थापक अध्यक्ष



बाबासाहेब वानखेडे, सुरेश रत्नपारखे, देविदास घुले, रंगनाथ चांदणे, कडुबा वाकीकर, महेंद्र शिंदे, शेख अकील, ड.अरशद बागवान, ड. रामेश्वर खांडेभराड, सचिन वानखेडे, नितीन तायडे यांनी केले आहे.

## विनयभंगप्रकरणी तीघांवर गुन्हा दाखल; प्रशांतीनगर भागातील घटना

**जालना । प्रतिनिधी -** विवाहीतेवर नातलगांनीच विनयभंग करुन जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा शुक्रवार (दि १८) रोजी दाखल करण्यात आला आहे. तालुका पोलीस ठाणे हद्दीतील एका पीडीत महिलेने तीन जणांविरुद्ध तक्रार दाखला केली होती. या तक्रारीत म्हटले होते की, १६ ऑक्टोबर २४ रोजी रोजी अडीच वाजेच्या सुमारास फिर्यादी महिला दोन मुलांसह घरी असतांना तिचे मामा सासरे व दोन जण घरी आले व मामेसासरे यांनी चहा करण्यास सांगितले. चहा करुन आणल्यानंतर एकाने वाईट हेतूने हात धरुन मनाला लज्जा वाटेल असा प्रश्न विचारला. ऐकत नाही म्हणून चापटबुक्क्यानी मारहाण केली. व नवऱ्यास सांगितल्यास सर्वांनाच जीवे मारण्याची धमकी दिली. महिलेच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## डॉ. स्वप्निल मंत्री यांच्या तक्रारीची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून दखल

परतूर । प्रतिनिधी - डॉ. स्वप्नील बी. मंत्री ह्यांची स्वच्छते विषयीच्या तक्रारीची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून दखल, नगरपालिका अधिकाऱ्यांना दिले योग्य निर्देश.

डॉ. स्वप्नील बी. मंत्री ह्यांनी परतूर शहर परिसरातील अस्वच्छता, दुर्गंधी व अशुद्ध पाणीपुरवठा ह्या संबंधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून ह्या विषयात लक्ष द्यावेत अशी मागणी केली असतां त्याची दखल घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून नगरपालिका अधिकाऱ्यांना योग्य ते निर्देश देवुन स्वच्छतेकडे लक्ष देवून नागरिकांना स्वच्छ पाणी पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ह्या विषयी वयक्तिक लक्ष देवून सामान्य नागरिकांना न्याय दिल्याबद्द्ल डॉ. स्वप्नील बी. मंत्री यांनी सर्व नागरिकांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विशेष आभार मानले.

## ग्रामीण विकास प्रतिष्ठानकडून
# एड्स नियंत्रण जनजागृती



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** नुकताच जालना जिल्ह्यात एड्स नियंत्रण संस्था मुंबई महाराष्ट्र शासन यांचेकडून जिल्हा शल्य चिकित्सक रुग्णालय जालना यांचे वतीने ग्रामीण विकास प्रतिष्ठान कोनड बु. या संस्थेच्या माध्यमातून दि.१५ते१७ ऑक्टोबर २०२४ ला शासनाने निवडलेले म हाराष्ट्रात सुप्रसिद्ध असलेले शाहीर नानाभाऊ परिहार आणि संच यांचे पारंपारिक शाहिरी पोवाड्यातून एड्स नियंत्रण जनजागृतीचे कार्यक्रम सादर करून एच आय व्ही विषाणू संसर्ग बद्दल एड्स कशाने होतो कशाने होत नाही व त्याची लक्षणे आणि एचआयव्ही संसर्गित रुग्णासाठी दिलासादायक उपाय या सर्व बाबीवर शाहिरांनी आपल्या पोवाड्यातून जन माणसांना समजेल असा संदेश देऊन राजुर, भोकरदन, अकोला देव, जाफराबाद, आणि माहोरा या पाच ठिकाणी त्यांच्या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यांचे सोबत भगवान ढवळे, जनार्दन पैठणे, शंकर जावळे, त्र्यंबक सोळंकी, विजय वराडे, ज्ञानेश्वर पिंपळे आदी कलाकारांनी सात संगत केली नियमित शाहीर परिहार यांचे कार्यक्रमाला प्रेक्षक आवर्जून गर्दी करतात,

# माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीची जाफराबाद येथे बैठक

**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** येथील शासकीय विश्राम गृह येथे माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती बैठक ठेवण्यात आली होती. या बैठकीला माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती जाफराबाद तालुका अध्यक्ष अशोक म्हस्के यांच्या मार्गदर्शनात संपन्न झाली. या बैठकीम ध्ये नवनिर्वाचित सदस्य व पदाधिकारी यांना नियुक्तीपत्र व ओळखपत्र वाटप करून नवनियुक्त सदस्यांचा सत्कार करण्यात आला. या बैठकीचे अध्यक्षस्थानी अशोक म्हस्के होते, या बैठकीला कार्यक्रमाची रूपरेषा माहिती अधिकार तालुका उपाध्यक्ष राम ससाणे यांनी सविस्तर सांगितली. माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती टेंभुर्णी सर्कल प्रमुख अनिल छबुराव ससाने यांनी सुद्धा आपले विचार मांडले. माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे कार्य आणि पुढील वाटचालीचे नियोजन याबाबत सखोल अशी माहिती दिली. प्रत्येक सदस्यांना किंवा पदाधिकाऱ्यांना ज्या कार्यालयात भ्रष्टाचार दिसेल तिथे माहिती अधिकार टाकल्यास त्यांना पूर्णपणे त्यांच्या पाठीशी उभा राहील अशी अशी ग्वाही दिली. भ्रष्टाचार मुक्त प्रशासन राहिले पाहिजे



असे करण्याचा निर्धार ठाम मांडला. बऱ्याच कार्यालयामध्ये भ्रष्टाचार होत असतो त्याची शहानिशा करून तेथे माहिती अधिकारातून माहिती मागून त्या भ्रष्टाचारावर आळा बसवण्यात येत असतो. माहिती अधिकार पत्रकार संरक्षण समिती याचा हे उद्देश म्हणजे यात पत्रकार सुद्धा असतात व ज्यांना पत्रकारी करायची नसते ते फक्त माहिती अधिकार यामध्ये काम करू शकतात. यामध्ये पत्रकार असो की माहिती अधिकाराचा सदस्य असो यांनी माहिती अधिकार एखाद्या कार्यालयात टाकल्यास, त्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी माहिती अधिकार पत्रकार संरक्षण समिती सदस्याला धमकी दिली असल्यास, त्यावेळेस पूर्ण महाराष्ट्रातील माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती त्या सदस्याला पाठिंबा देऊन पूर्णपणे त्यांच्या पाठीशी उभी राहिते. याम ध्ये पत्रकार असतात पत्रकारांना सुद्धा एखादी बातमी लावल्यास पुढील व्यक्तीकडून पत्रकारास धमकी आल्यास त्यावेळेस सुद्धा महाराष्ट्रातील माहिती अधिकार पत्रकार संरक्षण समिती त्या पत्रकाराला पाठीबा देऊन त्याच्या पाठीशी उभे राहिते. अशाप्रकारे माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती तालुकाध्यक्ष अशोक म्हस्के यांच्या अध्यक्षनिय भाषणातून सांगण्यात आले. यावेळी बैठकीस उपस्थित माहिती अधिकार पत्रकार संरक्षण समितीचे जाफराबाद तालुका सचिव ज्ञानेश्वर निकाळजे, जाफराबाद महिला तालुका अध्यक्ष गोदावरी लेभे ,जाफराबाद तालुका उपसचिव गजानन फलफले, माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समि तीचे टेंभुर्णी सर्कल प्रमुख आनील ससाने, तालुका कार्यकारणी सदस्य दिनकर जंजाळ, जाफराबाद तालुका कार्यकारणी सदस्य सुरेश खंदाडे, दीपक चोतमल, सुनिल भाले, इत्यादी होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुद्धा माहिती अधिकार तालुका उपाध्यक्ष राम ससाने यांनी केले. तसेच या कार्यक्रमाचे आभार माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे तालुका उपाध्यक्ष भाऊसाहेब आव्हाड यांनी केले. त्यानंतर जाफराबाद तहसील कार्यालयाचे तहसीलदार सारिका भगत व जाफराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे यांना माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीची जाफराबाद कार्यकारणीची नावे व मोबाईल नंबर माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे जाफराबाद अध्यक्ष अशोक म्हस्के यांच्याकडून देण्यात आली आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.